गुरुवार, दि. १२ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३०७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## निवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा कंत्राटी पद्धतीने सेवेत घेणार

**मुंबई -** मंत्रालयासह अनेक शासकीय ठिकाणी कंत्राटी भरतीला प्राधान्य देणाऱ्या राज्य सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाही कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेता येणार आहे. वयाच्या ६५ व्या वर्षांपर्यंत या अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने काम करता येणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाला कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी मात्र विरोध केला आहे. अशा अधिकाऱ्यांची निवड करताना मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच संधी दिली जाईल, भेदभाव होण्याची शक्यता असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.
राज्यातील बहुतांश खात्यातील जागा कायमस्वरुपी न भरता त्या कंत्राटी पद्धतीने भरण्याला राज्य सरकारने प्राधान्य दिलं आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी नव्याने भरतीच झाली नसल्याचं दिसून येतंय. त्यातच आता राज्य सरकारने पान २ वर

युवा आदर्श

### ॲक्शनमोड...

अमूक तमूक नेता
ऑन ॲक्शन मोड
उत्साह भरे अंगात
शब्द ऐकायले गोड
बसून राही खुर्चीत
गर्मीचे वाढले फोड
तिकडे फुटला पक्ष
हे खातात अक्रोड
आधी बसले शांत
घेऊन तक्या लोड
करायला हवे काही
आताशा घेती लोड
तुटूनि गेले आपले
फेविकॉलचा जोड
मैत्री करी नाठाळा
असूनही ते विजोड
योजना नाही स्पष्ट
कायम ती धरसोड
फ्लॅन करी ढिसाळ
समजती रण छोड
गेले सरदार तिकडे
करुन तोड न् मोड
आधा लढे त्यांचेशी
करू पाहती बिमोड

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

आमदार लोणीकरांचा पाठपुरावा यशस्वी; अतिवृष्टी अनुदान वाटपात ७५ कोटीचा घोटाळा झाल्याचे उघड

# २५ तलाठी, ३१ ग्रामसेवक, १७ कृषी सहाय्यक दोषी, तहसीलदार, नायब, तहसीलदार, लिपिक व कंत्राटी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरु

शेतकऱ्यांच्या हक्कावर दरोडा: लोणीकरांचा भ्रष्टाचाऱ्यांना धडा शिकवण्याचा इशारा; दोषींवर कारवाईची मागणी!

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात अतिवृष्टी, वादळ आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेल्या अनुदान वाटपात ७५ कोटी रुपयांचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. परतूर विधानसभा म तदारसंघाचे आमदार आणि माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा भ्रष्टाचार उजेडात आला. अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील अंतिम चौकशी अहवालात २५ तलाठी दोषी आढळले असून, तहसीलदार, नायब तहसीलदार, लिपिक आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू आहे. प्राथमिक अंदाजानुसार, एकूण अपहाराची रक्कम ८९ कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या घोटाळ्याने शेतकऱ्यांच्या हक्काचा निधी लुटला गेला असून, प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचाराचा क्रूर चेहरा समोर आला आहे.

**घोटाळ्याचा तपशील**

जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफ्राबाद तालुक्यांमध्ये १२,००० बोगस शेतकऱ्यांच्या नावाने अनुदानाची लूट झाल्याचे उघड झाले आहे. चौकशीत गंभीर प्रकार समोर आले यात बनावट नावांचा समावेश, बीड, अहिल्यानगर आणि बुलढाणा जिल्ह्यांतील व्यक्तींची नावे, ज्यांचा जालना जिल्ह्याशी संबंध नाही, यादीत घुसवली गेली., तलाठ्यांचा गैरप्रकार, तलाठ्यांनी तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून बोगस नावे अपलोड केली., बनावट अहवाल: संयुक्त पाहणी न करता बनावट अहवाल सादर करून डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) द्वारे बोगस खात्यांमध्ये पैसे वळवले गेले.

अपहाराच्या रकमेत अंबड तालुक्यात १५.९३ कोटी आणि घनसावंगी तालुक्यात १९.०३ कोटी, अशा एकूण ३४.९७ कोटींचा अपहार उघड झाला.

८-अ यादीत नाव नसणे, दुबार अनुदान वाटप, बोगस क्षेत्रवाढ, शासकीय जमिनीवर अनुदान या प्रकारात हा अपहार झाला आहे.

या अपहारात तलाठ्यांचा सहभाग आढळला असून २५ तलाठ्यांकडे १ कोटीपेक्षा जास्त रक्कम आढळली आहे.

लोणीकर यांनी स्वतः जिल्हाभर दौरा करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे आणि उपमुख्यमंत्र्यांकडे विशेष मागणी करून १५०० कोटींचा निधी मंजूर करवला होता. मात्र, तालुका आणि जिल्हा समितीतील अधिकाऱ्यांनी फेरतपासणीची जबाबदारी झटकून हलगर्जीपणा दाखवला, ज्यामुळे खऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित राहावे लागले.



जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले की, ५४ अधिकाऱ्यांच्या समितीने १,७३,००० शेतकऱ्यांचे रेकॉर्ड तपासले आणि ७२ पानांचा चौकशी अहवाल १० जून २०२५ रोजी सादर केला. यात २०२२ ते २०२५ पर्यंतचे ई-पोर्टल, ८-अ उतारे आणि ऑनलाइन-ऑफलाइन कागदपत्रांचा समावेश आहे.

अंबड तालुक्यातून ३.२० कोटी आणि घनसावंगी तालुक्यातून २.५४ कोटी, अशा एकूण ५.७४ कोटींची वसुली करून शासनाकडे जमा आहे.

या अपहार प्रकरणात २५ तलाठ्यांना ४८ तासांत खुलासा सादर करण्याच्या नोटिसा; निलंबन प्रस्तावित आहे. तहसीलदार, नायब तहसीलदार, लिपिक आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू करण्यात आलेली आहे. विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्ह्यांत चौकशीचे आदेश दिले; अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे याची जबाबदारी दिली आहे. जालना जिल्ह्यातील इतर सहा तालुक्यांचा अहवाल ३-४ आठवड्यांत येणे अपेक्षित आहे

४ जून २०२५ रोजी पत्रकार परिषदेत लोणीकर पान २ वर

## जालनेकरांचे समर्पण नाथांच्या कृपाछायेत शाश्वतपणे झळकत राहील - योगेशबुवा

नाथांच्या रथ सजावटीसाठी जालनेकरांकडून ११ किलो चांदी अर्पण



**जालना । प्रतिनिधी -** नाथ महाराजांच्या पालखी रथाला सजावटीसाठी अर्पण झालेली चांदी म्हणजे केवळ धातू नव्हे तर ती जालनेकरांच्या श्रद्धेची, भक्तीची आणि सेवेची ज्वलंत प्रतिमा आहे. या महासेवेच्या यज्ञात जालना शहराने सिंहाचा वाटा उचलला आहे, ही बाब केवळ अभिमानास्पदच नव्हे, तर अध्यात्मिक गौरवाचीही आहे. ज्याप्रमाणे चंद्र-सूर्य आकाशात अढळ आहेत, त्याचप्रमाणे ही सेवा आणि समर्पण नाथांच्या कृपाछायेत शाश्वतपणे झळकत राहील. हा रथ ज्यावेळी वारीत मार्गक्रमण करेल, त्यावेळी त्यावर झळकणारी चांदी हे केवळ सौंदर्य न राहता, ती भक्तांच्या अंतःकरणातील नाथप्रेमाची झलक ठरेल, अशा शब्दात योगेशबुवा गोसावी पालखीवाले यांनी आशीर्वादपर बोलतानाजालनेकरांचे दातृत्व अधोरेखित केले.

शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यातील रथ सजावटीसाठी जालनेकरांच्यावतीने ११ किलो चांदी संकल्पपूर्ती सोहळा आज बुधवार, दि. ११ जून रोजी जुना भागातील स्वयंवर मंगल कार्यालयात अत्यंत भक्तिभावाने पार पडला. संत एकनाथ महाराजांच्या रथ सजावटीसाठी जालना शहराने जे योगदान दिलं, ते केवळ चांदीचं नव्हे, तर हृदयाच्या खोल कप्प्यातून उमटलेलं निस्सिम श्रद्धेचं अर्पण असून, नाथभक्तीचं हे तेज काळाच्या ओघातही झळकत राहणार आहे.

प्रारंभी उद्योजक घनश्याम गोयल, अनिल गोयल, कांतीलाल राठी, संजय राठी, पन्नालाल बगडिया, जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, किशोर तिवारी आदींच्या हस्ते एकनाथ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व त्यानंतर श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळा प्रमुख रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले आणि योगेशबुवा गोसावी पालखीवाले यांचे पाद्यपूजन करण्यात पान २ वर

## शहरातील गोमांस विक्रीची दुकाने बंद करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा

सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शहरात गोमांस विक्री होत असून अशी दुकाने बंद करण्यात यावी व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी पोलीस अधिक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण देशात गोवंश हत्या कायदा लागू करण्यात आलेला आहे. सदर कायद्याची जालना शहरात अंमलबजावणी करण्यात यावी. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत कब्रस्थान जवळील खड्ड्यात गोवंशाचे



मास व डोके आढळले, सदर मांस तपासणीसाठी पाठविण्यात आले असले तरी हे प्रकरण उग्र रुप घेऊ शकते अशी शंका निवेदनात पान २ वर



## संपादकीय

# पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे!

छत्रपती संभाजीनगर येथे वाळूंज भागातील पत्नी पीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नी पीडित पुरुषांनी वटपौर्णिमच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळ पौर्णिमा साजरी केली. हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# युवा क्रांती संघ करिअर डेव्हलपमेंट सेंटर इंदापूर येथे विद्यार्थी गुणगौरव व करिअर मार्गदर्शन उत्साहात संपन्न

**बोरघर । माणगांव । प्रतिनिधी -** युवा क्रांती संघ संचलित करिअर डेव्हलपमेंट सेंटरच्या वतीने दहावी, बारावी, पदवी, डिप्लोमा, उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव, करिअर मार्गदर्शन तसेच काही विशेष सत्कार समारंभ करिअर डेव्हलपमेंट सेंटर, मु. उमरोली, ता. माणगाव, जि. रायगड येथे संपन्न करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना बॅग, नोटबुक, पेन इत्यादी शालोपयोगी वस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मनोज ओहेकर-सेवानिवृत्त उप आयुक्त GST, आयु. उदय कांबळे सेवानिवृत्त उप आयुक्त आयकर विभाग, आयु. राहुल सोनावणे अभ्यासक समुपदेशक व प्रमुख मार्गदर्शक सुनील कदम उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला विशेष सत्कारमुर्ती रविंद्र चिमणराव मोरे व जितेंद्र राव, मंगेश म. सोनावणे, नथू गवाणे, नंद साळवी, गौतम माळी, प्रकाश कासे, प्रकाश गायकवाड, मनोहर गायकवाड, राहुल गवाणे, प्रभाकर मोरे इ. तळा माणगांव रोहा तालुक्यातील मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवात प्राध्यापिका रेश्मा लोखंडे यांच्या मार्गदर्शनाने झाली त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास, शिस्त, नियमितता ई. गोष्टीविषयी मार्गदर्शन केले. त्यांनतर प्रमुख पाहुणे मनोज ओहेकर साहेब, उदय कांबळे साहेब, राहुल सोनावणे साहेब, यांनी आपल्या करिअरमधील अनुभव, अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना उस्फुर्तपणे मार्गदर्शन व करिअर मध्ये यशस्वी होण्यासाठी मोटीव्हेट केले. तसेच प्रमुख मार्गदर्शक सुनिल कदम सर व प्रमुख उपस्थिती असलेले प्रकाश कासे, इ. देखील विद्यार्थ्यांना अमुल्य मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेले विद्यार्थी शाक्य अजय गायकवाड, विश्वदीप सुर्यकांत कासे, सृष्टी भिमराव कानाडे, आर्या बाळकृष्ण लोखंडे, सानिया गुणाजी जाधव या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कशा पद्धतीने अभ्यास केला,

आपले ध्येय कसे साध्य केले, करिअर डेव्हलपमेंट सेंटरचा त्यांना कसा फायदा झाला हे नमूद केले.



याप्रसंगी काही विशेष सत्कार करण्यात आले, त्यापैकी जसलोक रुग्णालय येथून सेवानिवृत्त झालेले आयु. रविंद्र चिमणराव मोरे यांच्या वैद्यकीय सेवा, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन युवा क्रांती संघाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कु. आर्या रेश्मा बाळकृष्ण लोखंडे या विद्यार्थिनीने NMMS शिष्यवृत्ती परिक्षेत मुंबई विभागातून दुसरा क्रमांक पटकावल्याबद्दल तिचाही युवा क्रांती संघाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच तळा तालुका भारतीय बौद्ध महासभेचे माजी सचिव आयु. प्रकाशजी गायकवाड यांचा ङङइ उत्तीर्ण झाल्याबद्दल भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. संदेश सोनावणे तर सूत्रसंचालक म्हणून सुनील गायकवाड यांनी कार्यक्रमाची धुरा पार पाडली. कार्यक्रमाच्या तयारीपासून ते पुर्ण होईपर्यंत युवा क्रांती संघाचे कार्यकारी सदस्य प्रशांत शिंदे सर, नितीन शिर्के, सचिन शिंदे, सुभाष कासे, बाळकृष्ण लोखंडे, रेश्मा लोखंडे, नितीन साळवी यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला. सदर कार्यक्रमाला तळा माणगांव रोहा तालुक्यातील खेड्यापाड्यातील अनेक विद्यार्थी व पालकवर्ग उपस्थित होते.

# युवकांनो स्वतःच्या भविष्याचा विचार करा!

आजकाल स्वतःच्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणारे लोक प्रत्येक समाजात संख्येने खूप वाढले आहेत. विशेष करून युवा पिढीला राजकीय नेत्यांचे खूप आकर्षण वाटत आहे. त्यांना त्यांचे कट्टर कार्यकर्ते म्हणून मिरवायची फार विचित्र सवय लागली आहे. हे आजकालचे युवक शिक्षण शिकायचे सोडून, नियमित कॉलेज करायचे सोडून आणि आपले जीवन ध्येय गाठायचे सोडून राजकीय नेत्यांच्या मागेपुढे फिरण्यात आघाडीवर आहेत. शाळा व कॉलेजला दांड्या मारून आणि प्रामाणिकपणे अभ्यास करायचा सोडून राजकीय नेत्यांचे बगलबच्चे म्हणून मिरवण्यात काय फायदा? स्वतःच्या भविष्याचा विचार करायचा सोडून, राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणे खरंच योग्य आहे का? तुम्हीच सांगा मंडळी. मला तर हे योग्य वाटत नाही. आई वडील मोठ्या आशेने आपल्याला शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात. शिक्षणासाठी आपल्याला खूप खूप पैसा पुरवतात. त्यांना सुद्धा वाटते की आपला मुलगा खूप खूप शिकून नोकरीला लागेल. एक दिवस आपले स्वप्न साकार करेल आणि आपल्याला सुखाचे दिवस दाखवेल. म्हणून ते मोठ्या आशेने जीवन जगत असतात. त्यांना काय माहित? आपला मुलगा शिक्षणाच्या नावाखाली राजकारणाचे धडे गिरवत आहे का राजकीय पक्षाचा कार्यकर्ता बनून सतरंज्या उचलत आहे. मान्य आहे की, आपला नव्याने कॉलेजमध्ये प्रवेश झाला की, आपण थोडे दिवस नियमित कॉलेज करतो. मन लावून अभ्यास देखील करतो पण नंतर काही दिवसांनी तेथील राजकीय वातावरण पाहून आणि तशा मित्रांच्या संगतीत राहून आपण सुद्धा एखाद्या राजकीय नेत्याच्या पक्षात प्रवेश करतो.आणि लगेच त्या पक्षाचा नेता आपला राजकीय गुरु बनतो. आणि आपण त्याचे शिष्य बनतो. नंतर गुरु-शिष्याचे नाते हे अतुट बनते. तो नेता आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनतो. आपल्याला कोणते तरी गल्लीतील साधे पद देऊन खुश करतो. आणि स्वार्थासाठी आपला पुरेपूर वापर करून घेतो. पण या युवकांना मात्र आपण तालुक्याचा नेता झाल्यासारखे वाटते. आणि लगेच त्याचे राहणीमान बदलते. नेत्यासारखे कपडे आणि नेत्यासारखी हेअर स्टाईल ठेवून हे युवक हे पद घेऊन गावभर मिरवतात. बॅनरबाजी व पेपरबाजी करून स्वतः स्वतःच्या पदाचा प्रचार करतात. आपल्या नावापुढे त्या पदाचा उल्लेख मात्र आवर्जून करतात. त्यांना तो नेता प्राणप्रिय वाटायला लागतो. हे युवक त्या नेत्यासाठी जीव द्यायला पण मागे पुढे पाहत नाहीत. म्हणजे यांना स्वतःच्या भविष्यापेक्षा नेत्याच्या भविष्याची चिंता अधिक असते. त्यांना स्वतःच्या भविष्याचे काहीही देणे घेणे राहत नाही. पण राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार मात्र त्यांना रात्री सुखाची झोप सुद्धा येऊ देत नाही. एवढी राजकीय नेत्यांच्या भविष्याची चिंता त्यांना लागलेली असते. या लोकांना स्वतःच्या परिस्थितीची जाण नसते, स्वतःच्या भविष्याचा वेध नसतो, आपण काय करत आहोत याचे भान देखील नसते आणि आपले आई वडील काय करतात याचा थोडाही विचार नसतो तर त्यांच्या डोक्यात केवळ राजकारणाचे वेड असते. आपला नेता कसा मोठा होईल? आणि जादा मताधिक्य घेऊन कसा निवडून येईल? याकडे मात्र त्यांचे विशेष लक्ष असते. ज्यावेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका लागल्या जातात तेव्हा मात्र आमचे युवक आपल्या नेत्याला भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी खूप खूप प्रयत्न करतात. अहोरात्र त्यांचा प्रचार करण्यासाठी तालुका व जिल्हा पिंजून काढतात. त्यांना स्वतःच्या घराकडे देखील लक्ष द्यायला वेळ नसतो. घरातील आई-वडील, बायको व मुले यांना विसरून ते प्रचार करण्यात एवढे मग्न होतात की, त्यांना स्वतःच्या पोटाला दोन घास खावे याचे देखील भान राहत नाही. घरचे पैसे घालून गाडीत पेट्रोल टाकायचे आणि त्या नेत्याचा प्रचार करायचा हे समीकरण सध्या सर्वत्र चालू आहे. काही काही महाभाग तर इलेक्शन मध्ये तालुक्याचे भांडण गावात आणतात, आपल्या नेत्याच्या विरोधात जर कोणी अपशब्द बोलला तर त्याच्यासोबत भांडण तंटे करायलाही मागे पुढे पाहत नाहीत. पण एकमेकांच्या विरोधात प्रचार करणारी नेते मंडळी निवडून येऊ किंवा न येऊ पण ते आपले राजकीय ऋणानुबंध कधीच बिघडू देत नाहीत. पण हे युवक मात्र त्या राजकीय नेत्यांसाठी नाहक गावात दुश्मनी करून घेतात. यामध्ये या युवकांचा कवडीचाही फायदा नसतो. उलट त्यांना जमीन विकून घरून पैसा घालावा लागतो. त्यांचा फायदा आणि आपला तोटा हे वाक्य आमच्या युवकांना कधी कळणार? युवकांनो हे असे चालणार नाही. हे जरा लक्षात घ्या. त्यांच्यासाठी विनाकारण शिक्षणावर पाणी का सोडायचे? अशाने आपल्याला जीवन ध्येय कसे गाठता येईल?

अगोदर स्वतःच्या भविष्याचा विचार करा. स्वतःचे भविष्य घडवून स्वतःच्या पायावर उभे रहा. त्यासाठी खूप खूप शिक्षण शिका. अहोरात्र अभ्यास करा आणि आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करून मग राजकारणात प्रवेश करा. कारण उपाशी पोटी बनलेला कार्यकर्ता लाचार बनतो हे आपल्याला डॉ.बाबासाहेबांनी अगोदरच सांगून ठेवले आहे. उच्चशिक्षित व राजकीय वलय असलेला कार्यकर्ता राजकारणात यशस्वी होतो हे कोणालाही मान्य करावेच लागेल. नाहीतर अर्ध्यावर शिक्षण सोडून राजकीय नेत्यांच्या मागे फिरणारे युवक आज दिशाहीन होऊन अंधारातच चाचपडत आहेत. त्यांना गावात कोणी विचारायला देखील तयार नाही. त्यांची घरे राजकारणात शेती विकून उध्वस्त झाली आहेत. आणि खूप खूप शिक्षण शिकून व स्वतःच्या पायावर उभे राहून राजकारणात प्रवेश करणारे राजकारणी आज यशस्वी झाले आहेत. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. म्हणून बांधवांनो खूप खूप शिक्षण शिका... नोकरीला लागून स्वतःच्या पायावर उभे रहा, स्वतःचे भविष्य घडवा आणि मग राजकारणात प्रवेश करा कारण तुमच्यावर लाचारी पत्करण्याची वेळ येणार नाही... हे नेहमी ध्यानात ठेवा...



**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा.लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## पान १ वरुन

### २५ तलाठी ...

यांनी तीव्र संताप व्यक्त करत म्हणाले, शेतकऱ्यांच्या रक्तरंजित निधीवर दरोडा खपवून घेतला जाणार नाही. भ्रष्ट यंत्रणेला उखडून टाकण्यासाठी आम्ही लढा देणार असल्याचे सागतांनाच दोषी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबन. पुराव्यांशी छेडछाड टाळण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती. दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा करण्याची मागणी आ. लोणीकर यांनी केली होती.

आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना मतदारसंघाचे आमदार अर्जुन खोतकर, बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे आणि घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत उढान यांच्यासह विधानसभा अधिवेशनात हा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे मांडण्याची घोषणा केली. अर्ध्या तासाच्या चर्चेतून सरकारचे लक्ष वेधून सखोल चौकशी आणि कडक कारवाईची मागणी केली जाईल. जालना जिल्ह्यात अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यासाठी मंजूर निधीपैकी १०० कोटी रुपये बोगस खात्यांत वळवल्याचा आरोप लोणीकर यांनी यापूर्वी केला होता. २०१४ मध्ये अतिवृष्टीसाठी मंजूर ४१२ कोटींपैकी फक्त ३३० कोटी वाटप झाल्याचे जिल्हाधिकारी पांचाळ यांनी मान्य केले, ज्यावरून अनुदान वितरणातील गैरप्रकारांचा दीर्घकालीन इतिहास दिसतो. हा घोटाळा केवळ शेतकऱ्यांवर अन्याय नाही, तर शासनाच्या विश्वासार्हतेवर हल्ला आहे. खऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ निधी मिळवून देण्यासाठी आणि भ्रष्टाचार्यांना शिक्षा होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे लोणीकर यांनी ठणकावले. त्यांनी शेतकऱ्यांना एकजूट होऊन भ्रष्ट यंत्रणेला धडा शिकवण्याचे आवाहन केले. आमदार बबनराव लोणीकर यांनी सरकारला तात्काळ कारवाई करून खऱ्या शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या हक्कासाठी लढण्याचे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवण्याचे आवाहन त्यांनी केले.

### जालनेकरांचे समर्पण ...

आले. त्यानंतर भाविकांनी संकल्पपूर्वक संकलित केलेली ११किलो चांदी नाथ महाराजांच्या रथ सजावटीसाठी रघुनाथबुवा पालखीवाले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. पुणे येथे तयार होणाऱ्या सागवान रथावर चढविण्यासाठी १२० किलो चांदीच्या कार्यात जालनेकरांनी दिलेले हे योगदान भक्तीचा झरा ठरणार आहे. चांदी अर्पण ही नाथांप्रतीची शुद्ध भावना असून, त्या भावनेने सजलेला हा रथ, पंढरीच्या वाटेवर भक्तांच्या हृदयाची ओंजळ घेऊन मार्गक्रमण करणार असल्याचे योगेशबुवा गोसावी म्हणाले.

चांदी संकल्प पूर्तीसाठी योगदान देणारे घनश्याम गोयल, अनिल गोयल, कांतीलाल राठी, संजय राठी, पुरुषोत्तम मोतीवाला, पन्नालाल बगडिया, रामनिवास गौड, प्राचार्य दयानंद भक्त, अंकुशराव राऊत, शरद जयस्वाल, वामनराव राऊत, धनराज लोंढे, किशोर तिवारी, अभय कुलकर्णी, दीपक अंभोरे, प्रसन्ना जाफराबादकर, राजेंद्र जयस्वाल, बंकटलाल खंडेलवाल, सूर्यनारायण गजबी, भारतीताई नाईक, रेखाताई कुलकर्णी, विजय महाराज संगमुळे, संजय महाराज संगमुळे आदींचे रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले आणि योगेशबुवा गोसावी पालखीवाले यांच्याहस्ते वारकरी परंपरेनुसार टोपी, रुमाल आणि संत एकनाथ महाराजांची प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविकपर भाषणात भक्तामल प्रवक्ते किशोर तिवारी म्हणाले की, हरे कृष्ण सत्संग समितीने नाथांच्या रथासाठी चांदीचे योगदान देण्याचा संकल्प केल्यानंतर दान करण्यासाठी अनेक हात पुढे आले आणि संकल्पपूर्ती झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन जोशी यांनी केले. यावेळी दानदात्यांसह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महाप्रसादाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

### शहरातील गोमांस ...

व्यक्त करण्यात आली. त्यामुळे धार्मिक तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे गोवंश हत्या कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याबरोबरच शहरातील सुरु असलेले गोमांस विक्रीची दुकाने तात्काळ बंद करण्यात यावी व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावी. निवेदनावर साद बिन मुबारक यांची स्वाक्षरी आहे.

### निवृत्त अधिकाऱ्यांना ...

आणखी निर्णय घेतला आहे. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सरकारी अधिकाऱ्यांना पुन्हा कंत्राटी पद्धतीने सेवेत घ्यायचा मार्ग मोकळा झाला आहे.

वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत अशा अधिकाऱ्यांना कंत्राटी भरतीच्या माध्यमातून सेवेत घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामध्ये सर्व शासकीय आणि निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येणार आहे.

सध्या राज्यात शासकीय निवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे. त्यामुळे करार पद्धतीने अशा अधिकाऱ्यांना आणखी सात वर्षे सेवेत राहता येणार आहे. मात्र राज्य सरकारच्या या निर्णयाला कर्मचारी, अधिकारी संघटनांचा विरोध आहे. जर राज्य सरकार ६५ वर्षापर्यंत करार पद्धतीने कामावरती घेत असेल तर निवृत्तीचं वय ६० वर्षे का करत नाही असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

राज्यात सध्या शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तीचे वय ५८ वर्षे इतके आहे. ते वाढवून ६० वर्षे करण्यात यावे अशी मागणी सातत्याने केली जात आहे. या आधी निवृत्तीचे वय हे ६० वर्षेच होतं. पण नंतर ते कमी करून ५८ इतके करण्यात आलं. आता निवृत्तीचे वय पुन्हा ६० वर्षे करावे अशी मागणी कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी केली आहे.

## वारसा मानवतेचा

माणूस जन्मजात खूप श्रीमंत आहे...
आलिशान गाडी व आलिशान बंगला आहे...
पण त्याच्या पोटाला संतती चांगली नाही
मग त्याच्या श्रीमंतीला काहीच अर्थ नाही...
पोटाला संतती जर व्यसनी निघाली...
तर समजा पैसा आणि संपत्ती पाण्यात गेली...
बापाने पैसा व संपत्ती खूप सांभाळून ठेवली...
पण मुलाने मात्र दारू व मटक्यात घालवली...
माणसांनो जीवनात पैसा थोडा कमी कमवा...
पण अगोदर जीवनात चांगली संतती कमवा...
माणसाला जीवनात चांगली संतती असेल...
तर म्हातारपणात त्याला खूप मोठा आधार असेल...
भलेही माणूस पैशाने थोडा गरीब असावा...
पण त्याच्या पोटाला मुलगा व्यसनी नसावा...
तर त्या माणसाला समाजात खूप किंमत असेल...
म्हातारपणात तो मुलगाच त्या बापाची काठी असेल...
हल्ली आपण सगळेजण सर्वत्र पाहतोय...
मुलगा आईवडिलांना वृद्धाश्रमात पाठवतोय...
पत्नीचे ऐकून आई-वडिलांना दूर करतोय...
विभक्त होऊन बायको मुलांत रममान होतोय...
आईवडिलांनी मुलांना सुसंस्कारी बनवावे...
बालपणापासूनच त्यांना आपल्या धाकात ठेवावे...
म्हणजे ते वाईट व्यसनापासून अलिप्त राहतील...
तुम्हाला म्हातारपणात खूप खूप जीव लावतील...
अतिलाडात वाढलेली मुले बिघडत आहेत...
पुढे चालून व्यसनी व दारुडे निघत आहेत...
आईवडिलांना उतारवयात वाऱ्यावर सोडून
आणि कुठेतरी लांबच्या दुनियेत जाऊन
तिकडेच बायको लेकरांत मग्न होत आहेत...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१**

# तडेगांवकरांच्या काव्यात विलक्षण सामर्थ्य - प्रा.मधुकर जोशी

## गच्चीवरचा शब्दमोहोर कवितांचे अभिवाचन, समीक्षात्मक संवाद, सत्कार सोहळा

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** आपले संपूर्ण जीवन आपण दुसऱ्यांनी घालून दिलेली पायवाट आणि प्रतिक्रियेवरच जगत असतो. सांगणाऱ्यांनी तटबंदी निर्माण केली, आपल अवकाश आपण बंदिस्त करून ठेवले. स्वतःच्या पायवाटेने, स्वतःचे अस्तित्व नाही अशा स्थितीत हजारो फुलांच्या जाती गुण्या-गोविंदाने नांदत असताना दंगल झाल्याचे ऐकिवात नाही असे संपूर्ण साहित्य चार ओळीत विशद करण्याचं विलक्षण सामर्थ्य डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या काव्यसंग्रहांत आढळते. असे प्रतिपादन समीक्षक प्रा. मधुकर जोशी यांनी केले.



शिवनगर परिसरातील तडेगांवकर यांच्या निवासस्थानी गच्चीवरचा शब्दमोहोर या साहित्यिक उपक्रमांतर्गत शनिवारी (ता. ०७) सायंकाळी चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाव कवयित्री डॉ. संजीवनी तडेगांवकर यांच्या भुईतून उगवलेली बाई या आगामी कवितासंग्रहातील निवडक कवितांचे अभिवाचन, समीक्षात्मक संवाद, सेवानिवृत्ती बद्दल प्रा. डॉ. शोभा यशवंते यांचा सत्कार सोहळा रोहिणी नक्षत्राच्या सरींमध्ये चांगलाच रंगला.

जेष्ठ साहित्यिका रेखा बैजल यांनी काट्यांचा उरूस या कवितेवर भाष्य करताना प्रतिमा, सामाजिक वास्तवता आढळते, भाव सहजपणे येतात असे सांगितले.

चित्रकार श्रीधर अंभोरे यांनी निसर्गाचे सौंदर्य डॉ. संजीवनी तडेगावकर यांना नेमकेपणाने हेरता येत असल्याचे नमूद केले. गुलाबराव पाटील यांनी भ्रमाचा भोपळा या कवितेवर भाष्य करतांना पती-पत्नीच्या तर्काचे विचार संशयात रूपांतरित होतात. वेदना, वास्तवाचा चपखल अर्थ वाचतांनाच समजतो, असे सांगितले.

प्रस्ताविकात पंडितराव तडेगांवकर यांनी निकोप साहित्यिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हावे यासाठी उपक्रम राबविण्यात येत असल्याची भूमिका स्पष्ट केली.

डॉ. उध्दव थोरवे, प्रा. शशिकांत पाटील, डॉ. पुरूषोत्तम जुन्रे यांनी भुईतून उगवलेली बाई मधील कवितांचे अभिवाचन करून समीक्षात्मक भाष्य केले. याप्रसंगी सेवानिवृत्ती बद्दल प्रा. डॉ. शोभा यशवंते यांचा सपतीक सत्कार करण्यात आला. प्रारंभी ज्येष्ठ समाजसेवक कै. बाबुराव मामा सतकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सूत्रसंचालन प्रा. डॉ.शोभा यशवंते,प्रा. अशोक खेडकर, यांनी केले तर डॉ.संजीवनी तडेगांवकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. नारायण बोराडे,डॉ.जगन्नाथ खंडागळे, इंजि. एस. एन. कुलकर्णी, प्रा. बसवराज कोरे, शिवकुमार बैजल, विनीत साहनी, प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्राचार्य सुनील सोलाट, डॉ. सुधाकर जाधव, बाळासाहेब तनपुरे, डॉ. संदीप पाटील, ड. देवराव सोनवणे, पांडुरंग सांगळे, शांतीलाल बनसोडे, डॉ. राज रणधीर,बाबासाहेब तरवटे, प्रदीप देशपांडे ,सौ.संगीता राजेंद्र राख, डॉ.अस्मिता शिंदे, सौ.सीमा रसाळ, संतोष लव्हटे, आदींची उपस्थिती होती.

**महिला व बालकांसाठी कार्य करणार : डॉ. यशवंते**

साहित्य वाचन ,कवी मैत्रिणींचा सहवास यांचे प्रभाव आपल्यावर पडले. सातत्याने होत असलेल्या साहित्यिक ,सांस्कृतिक उपक्रमांमुळे जिल्ह्याचे वातावरण हे कवी मनाचे होत आहे. छोटी बालके आणि वृद्ध महिला यांच्याशी संवाद साधण्यास आपल्याला आवडत असून निवृत्तीनंतर हा उपक्रम आपण नेटाने राबविणार असल्याचे प्रा. डॉ. शोभा यशवंते यांनी सत्कारास उत्तर देतांना सांगितले.

# पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांनी दिले कबुतराला जीवनदान

## धाग्यात अडकला होता कबुतराचा पाय



**पनवेल । प्रतिनिधी -** वटपौर्णिमेच्या निमित्ताने वडाच्या झाडाला बांधलेल्या धाग्यात एका कबुतराचा पाय अडकून तो हालहाल करत होता. ही दुर्दशा पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन तिथे असलेल्या पुष्पा आवटे यांना सोबत घेऊन कबुतराच्या पायातील धागा सोडवला आणि त्या कबुतराला जीवदान दिले.दिलीप कोकाटे यांनी संयम,काळजी आणि माया दाखवत कबुतराला सुरक्षितरीत्या मुक्त केले. नागरिकांनी त्यांच्या या कृत्याचे कौतुक केले असून,धार्मिक कार्य करताना निसर्ग आणि प्राणिमात्रांची काळजी घेण्याचे महत्त्वही या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

# पारंपारिक पद्धतीत गुरुकुलम शिशुवाटिकेचा श्रीगणेशा

**बदनापूर । प्रतिनिधी -** इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या भाऊ गर्दीत आपलं वेगळेपण जपणारी बदनापूर शहरातील गुरुकुलम शिशु वाटिका ही मराठी माध्यमातून आधुनिक शिक्षण देणारी शाळा आज उन्हाळी सुट्टी नंतर पुन्हा सुरू झाली.

सुट्ट्या संपून परत पुढच्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ भारतीय पारंपरिक पद्धतीने म्हणजेच औक्षण करून व सरस्वती पूजनानने करण्यात आला.याप्रसंगी अनेक उपस्थित पालकांचे देखील शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

विद्याभारती देवगिरी प्रांत संलग्नित व देवगिरी प्रतिष्ठान बदनापूर संचलित गुरुकुलम शिशुवाटिका ही बदनापूर तालुक्यातील मराठी भाषेतून शिक्षण देणारी एकमेव शाळा असून आपल्या नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतीने संस्कारपूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून या शाळेने पंचक्रोशीत नावलौकिक कमावला आहे.

शाळेच्या प्रवेशाच्या दिवसास ओपनिंग सेरेमनी सारखे इंग्रजी नाव न देता




शाळेचा श्रीगणेशा असे संस्कृती दर्शक नाव देऊन शाळेच्या प्रशासनाने एक नवीन पायंडा पाडला आहे. या कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ. रामेश्वर पाटील,सहसचिव ड.बालाजी वाघ,श्री. मदनराव पाटील, बद्रिनाथ आरसूळ ,डॉ.अनुराधा पाटील,भागवत पवार सिद्धेश शेळके,शिक्षिका सौ.अश्विनी डिगे, सौ.योगिता शिरसाट, सौ. निकिता लहाने, व्यवस्थापक श्री. नवनाथ गव्हाणे आदींची उपस्थिती होती.

# वृक्ष लागवड काळाची गरज - बनकर

## क्रिस्टल कंपनीकडून वृक्ष सातेफळ येथे वाटप




**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील सातेफळ येथे क्रीटल अर्गो कंपनीचे विष्णू बनकर हे निसर्गप्रेमी असून वातावरणाचा ऱ्हास पाहता त्यांनी त्यांच्या कंपनीच्या माध्यमातून विविध प्रकारचे वृक्ष देण्याचा निर्णय केला अन त्याला सातेफळ येथे मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला असल्याचे मारुती बनकर यांनी सांगितले.

सातेफळ येथे शालेय शिक्षण समिती अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली हजारो झाडे वाटप करण्यात आली असून त्या वृक्षाची संगोपन करण्याची जबाबदारी गावातील लहान मोठ्यासह विद्यार्थ्यांनी घेऊन सातेफळ गावाचे नाव जिल्ह्यात मोठे करावे असे त्यांनी यावेळी सांगितले. वृक्ष घेऊन जाणे हे महत्त्वाचे नसून हे वृक्ष आपल्या पुढील पिढीसाठी योगदान ठरणार असून आपल्या पुढील पिढीच्या उज्वल भविष्यासाठी त्यांना वाढवणे ही अति महत्वाचे आहे.कुटुंबातील प्रत्येक सदस्याने एक वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करणे आवश्यक आहे .विशेषतः आपण लागवड केलेला वृक्ष कायमस्वरूपी आपली आठवण राहील असे असे ते म्हणाले यावेळी क्रिस्टल ॲग्रो कंपनीचे ,दीपक पिसे,विष्णू बनकर ,ज्ञानेश्वर बनकर, यासह शालेय विद्यार्थीसह गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

# झोन स्तरीय निरंकारी बाल समागम

**जालना । प्रतिनिधी -** सदगुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या आशिर्वादाने झोन स्तरीय निरंकारी बाल समागम जालना येथे आयोजित केला आहे. रविवार दि.१५ जून २०२५ सकाळी ११ ते २ या वेळेत मुक्तेश्वर सांस्कृतिक सभागृह एवं लॉन्स, मोतीबाग रोड, जुना जालना येथे आयोजित केला आहे. या प्रसंगी संत निरंकारी मडंळाचे बिलासपुर छत्तीगड येथील झोनल प्रमुख परम पुज्य सुदंर श्यामजी यांच्या मुख्य प्रवचनाचा कार्यक्रमही आयोजित केला आहे. तरी जालना जिल्हा व छत्रपती संभाजीनगर येथील सर्व बालकांनी व त्यांच्या पालकांनी तसेच भाविक भक्तांनी मोठ्या सख्येने उपस्थित राहून परम पुज्य सुंदर श्यामजी यांच्याअमृत वचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगर येथील प.पूज्य हरीष खुबचंदानी, छ. संभाजीनगर येथील सिडको ब्रँचचे संयोजक डी. जी. दळवी, जालना जिल्हा संयोजक राजकुमार पारसवाणि, किरण गरड, छ. सभाजीनगर सिंधि कॉलनी ब्रँचचे मुखि सचिन अधाने यांनी केले आहे.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

# परिक्षक व नियामक यांचे पेपर तपासणीचे मानधन तत्काळ द्या

## मराठवाडा शिक्षक संघाची विभागीय सचिव यांच्याकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी -** फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परिक्षेच्या तपासलेल्या उत्तर पत्रिकांचे मानधन तात्काळ देण्यात यावे असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय सचिव यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे सचिव संजय येळवंते यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेच्या उत्तर पत्रिका तपासलेल्या परीक्षक व नियामकांना दिले जाणारे मानधन शिक्षण मंडळाने अद्याप पर्यंत दिले नाही तरी ते त्वरीत देण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगरचे सचिव भाई चंद्रकांत चव्हाण व जालन्याचे सचिव संजय येळवंते यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव यांना प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देऊन केली आहे.

मागणीकडे दुर्लक्ष केल्यास व वेळकाढूपणाचे धोरण अवलंबविल्यास मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या मार्गदर्शना व नेतृत्वाखाली आपल्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनात दिला आहे.सदरील निवेदन मंडळाच्या उपसचिव प्रियाराणी पाटील यांनी स्विकारले. निवेदनावर मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण, जालना जिल्हा सचिव संजय येळवंते यांच्यासह संघटनेचे ए.एस.ढमढेरे, व्ही.ई.चव्हाण, व्ही.आर.सोलाटे, विनोद केनेकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# प्रशिक्षणामुळे व्यक्तीचे ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता वाढ, प्रशिक्षणार्थी शिक्षकांना अधिक कार्यक्षम बनवण्याचा प्रयत्न

## सुलभक प्रा.आर.व्ही. कांगणे यांचे प्रतिपादन

**मंठा । प्रतिनिधी -** शिक्षणाची आवश्यकता व्यक्ती आणि संस्थेच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. प्रशिक्षणामुळे व्यक्तीचे ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता वाढतात, ज्यामुळे ते अधिक कार्यक्षम होतात आणि त्यांच्या करिअरमध्ये प्रगती करतात. तसेच, प्रशिक्षणामुळे संस्थेची उत्पादकता आणि गुणवत्ता सुधारते, कर्मचारी अधिक सक्षम होतात आणि संस्थेचा विकास होतो. प्रशिक्षण हे व्यक्ती आणि संस्थेच्या विकासासाठी आवश्यक आहे. ते व्यक्तीला अधिक सक्षम बनवते, संस्थेची उत्पादकता वाढवते आणि करिअरमध्ये प्रगती करण्यास मदत करते असे प्रतिपादन सुलभक प्रा. आर व्ही कायंदे यांनी केले.

वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण २०२५-२६ चे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत जिल्ह्यातील पात्र शिक्षकांनी ऑनलाईन नाव नोंदणी परिषदेमार्फत विकसित पोर्टलद्वारे करून सदर शिक्षकांचे अनिवासी प्रशिक्षण दि.०२/०६/२०२५ ते १२/०६/२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचा आज ७ वा दिवस होता. वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणपूर्व, प्रशिक्षण दरम्यान व प्रशिक्षणानंतर काय? यासर्व बाबीसंदर्भात मार्गदर्शक सूचना शिक्षकांना देण्यात आल्या. प्रसंगी सुलभक प्रा.कांगणे बोलत होते. यावेळी सूलभक एस.पी. गोर्डे, श्री वैद्य सर, पारसकर सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मा. संचालक SCERT पुणे यांचे मार्गदर्शक पत्रानुसार तालुकास्तर प्रशिक्षणार्थीच्या संख्येनुसार प्रशिक्षण स्थळ निश्चित करून शिक्षकांना प्रशिक्षण देणे सुरू आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४, शाळा मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा इ. परिषदेच्या संकेतस्थळावरील साहित्याचे अवलोकन करण्यात यावे तसेच कला व क्रीडा शिक्षकांचे तालुकास्तरीय ७ दिवसीय प्रशिक्षण नियमित प्रशिक्षण वर्गासोबत दिनांक २ जून ते १२ जून एकूण १० दिवस या कालावधीत होईल, त्यांच्या मूल्यांकन, उपस्थिती बाबतच्या नोंदी संबंधित प्रशिक्षण केंद्रावरील समन्वयक ठेवणार आहेत व १२ जून रोजी त्यांना प्रशिक्षणातून कार्यमुक्त करण्यात येणार आहे असे सुलभक एस.पी. गार्डे यांनी स्पष्ट केले.



तालुकास्तरावर आयोजित या प्रशिक्षणासाठी दिलेल्या वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक असून प्रशिक्षणार्थ्यांची दररोज प्रत्येक तासिकेला उपस्थिती असल्याचे तासिका निहाय स्वाक्षरीपत्रक प्रशिक्षण पोर्टलवरून डाउनलोड करून ती प्रत्येक तासिकेदरम्यान स्वाक्षरीसाठी उपलब्ध होणार आहे व प्रत्येक तासिकेदरम्यान स्वाक्षरी येऊन तासिका निहाय उपस्थितीची नोंद पोर्टलवर विहित वेळेत अपलोड केली जाते. तासिकेनंतर घेतल्या जाणाऱ्या बहुपर्यायी चाचणी व सुलभकांच्या तासिकेबद्दल प्रत्याभरासाठीची लिंक उपलब्ध करून दिली जाते. प्रशिक्षणाच्या शेवटी लेखी चाचणीचे नियोजन परीक्षा पद्धती प्रमाणे करण्यात येते. असे सुलभक श्री पारसकर यांनी यावेळी स्पष्ट केले. प्रशिक्षणार्थ्यांना ५ स्वाध्याय व प्रकल्प/ कृतीसंशोधन नवोपक्रम अहवाल प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ४० दिवसात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना येथे विहित मुदतीत जमा करावा लागणार असून आपल्या केंद्रावरील सर्व प्रशिक्षणार्थ्यांकडून पाच स्वाध्याय व प्रकल्प कृतीसंशोधन उपक्रम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या संदर्भात सुलभकांना तपासणी, मूल्यांकन आणि तक्त्यात गुणांची नोंद करण्यात येणार आहे असे सुलभक श्री वैद्य सर यांनी स्पष्ट केलं.

यावेळी प्रा.सहदेव मोरे पाटील, प्रा.ओमप्रकाश बोरकर, प्रा.पंकज कद्रे, शंकर राठोड, संदीप सानप सुनील राठोड संदेश राठोड योगेश रोहिणकर जगन्नाथ जगताप कल्पना शिंदे प्रदीप राठोड पृथ्वीराज राठोड रवी राठोड वर्षा पवार मुनीब अमानी शिवाजी टेकाळे शिवगंगा लिंगनवाढ संदीप पवार गजानन जाधव संतोष अंभोरे मुरलीधर कायंदे राजेश राठोड श्याम राऊत मिर्झा बेग विलास हाके मधुकर कराळे प्रशांत प्रशांत काळे सिद्धीकि गौस विष्णू खरात भागवत बरकुले संजीव वावळे पांडुरंग बेले अनिता पवार सतीश वावळ राहुल सवादे नारायण खरात सिद्दिकी गौस भगवान वघराळ यांच्यासह अनेक प्रशिक्षणार्थींची उपस्थिती होती.

## सूर्यकांत इंगळे पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्काराने सन्मानित!



**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षी संत कक्कय्या सम ाजाचे नेते, कामगार क्षेत्रात अविस्म रणीय काम केलेले श्री सूर्यकांत इंगळे यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या हस्ते पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी मंचावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट,रोजगार हमी रोहिदास योजना मंत्री भरतशेठ गोगावले, जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, समाजकल्याण विभागाचे आयुक्त प्रवीण पुरी उपस्थित होते. सूर्यकांत इंगळे यांना जाहीर झालेल्या पुरस्काराने समाजात विविध क्षेत्रातून त्यांच्यावर आनंदाचा वर्षाव होत आहे.

### जिल्हा महिला रुग्णालयात किरिट सोमय्या यांची आढावा बैठक

# जिल्हा स्त्री रुग्णालयातून १ हजार ७१९ बनावट जन्म प्रमाणपत्र वाटप करण्यात आले - किरीट सोमय्या

**जालना । प्रतिनिधी -** बुधवार रोजी दुपारी दोन वा. च्या सुम ारास किरिट सोमय्या यांनी म हिला बाल रुग्णालय येथे आढावा बैठक घेतली.

जालना जिल्हा महिला आणि बाल रुग्णालयात जन्म प्रमाणपत्र घोटाळा झाल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला आहे. आज सोमय्या यांनी जिल्हा म हिला आणि बाल रुग्णालयाला भेट दिली.१७१९ जन्म प्रमाण पत्र वाटपात घोटाळा झाला असल्याचा आरोप करत कदीम जालना पोलिस ठाण्यात या घोटाळ्याबाबत गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी तक्रार दाखल केली आहे. जिल्हा म हिला रुग्णालयातून २ हजार ५३२ जन्म प्रमाणपत्र देण्यात विलंब केल्याचा आरोप देखील सोमय्या यांनी केला. १ वर्षांपेक्षा अधिक विलंबित जन्म नोंदीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार हा जिल्हा दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांना असताना दवाखान्याचे जिल्हा शल्य चिकित्सक अथवा वैद्यकीय अधीक्षक यांनी हा घोटाळा केला असून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सोमय्या यांनी केलीय.

## बनावट जन्म प्रमाणपत्र वाटप केल्याप्रकरणी कदिम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल



सोमय्या आज जालना दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयातील जन्म प्रमाणपत्र वाटप बद्दल माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा स्त्री रुग्णालयातून १ हजार ७१९ बनावट जन्म प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेत अशी माहिती सोमय्या यांनी दिलीय. दरम्यान, जिल्हा स्त्री रुग्णालयातून वाटप करण्यात आलेल्या बनावट जन्म प्रम ाणपत्रांबद्दल सोमय्या यांनी कदिम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. जालना जिल्हा स्त्री रुग्णालयातून वाटप करण्यात आलेल्या बनावट जन्म प्रमाणपत्रांची चौकशी केली जाईल असं ही सोमय्या म्हणालेत. दरम्यान, या चौकशीत जो कोणी अधिकारी - कर्मचारी दोषी आढळेल त्याच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल असा इशाराही सोमय्या यांनी दिला आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.